कुंभी कासारी सहकारी बँक लि., कुडित्रे.

४१ वा वार्षिक अहवाल

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांसाठी)

बँकेच्या सर्व सभासदांना कळविणेत येते की, आपल्या बँकेची सन २०२४-२०२५ या वर्षाची ४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा गुरूवार दि.२६.०६.२०२५ इ. रोजी दुपारी १.०० वाजता शेतकरी सांस्कृतिक भवन, कुंभी कासारी सहकारी साखर कारखाना परीसर कुडित्रे येथे आयोजित केली आहे. तरी सदर सभेस सर्व सभासदांनी अगत्याने उपस्थित रहावे, ही विनंती.

**- सभेपुढील विषय -**

१) मागील दि.१३.०८.२०२४ इ.रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) सन २०२४-२०२५ सालाचा ताळेबंद व नफा-तोटा पत्रक यांची नोंद घेणे आणि त्यास मान्यता देणे.

३) संचालक मंडळाने सुचविलेल्या दि.३१.३.२०२५ अखेरचे नफा विभागणीस मंजुरी देणे व लाभांश जाहीर करणे.

४) सन २०२५-२०२६ चे अंदाजपत्रकास मंजुरी देणे व सन २०२४-२०२५ मध्ये अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे.

५) वैधानिक लेखापरिक्षक **'मा. विश्राम कुलकर्णी ॲन्ड कंपनी चार्टर्ड अकौटंटस्,(FRN- 139008W)'** इचलकरंजी यांचेकडून आलेल्या व अंतर्गत लेखापरिक्षक **'मा. एस्.आर.बकरे ॲन्ड कंपनी सी.ए. '** व कंकरंट लेखापरिक्षक **'मा. मंदार एम्. धर्माधिकारी चार्टर्ड अकौटंट'** यांचेकडून आलेल्या सन २०२४-२०२५ सालचे हिशोब तपासणी अहवालाची नोंद घेणे.

६) सन् २०२६-२०२७ सालासाठी अंतर्गत लेखापरिक्षकाची नेमणूक करणे व मेहनताना ठरविणे.

७) सन् २०२५-२०२६ सालाकरिता वैधानिक लेखापरिक्षकांचे नेमणूकीबाबत मा. संचालक मंडळाने शिफारस केलेनुसार रिझर्व बँक ऑफ इंडिया यांचे निकषास अधिन राहून नेमणूक करणे व मेहनताना ठरविणे.

८) एकरकमी परतफेड/ आदी योजने अंतर्गत सवलत देणेत आलेल्या कर्जांची नोंद घेवून त्यास मंजुरी देणे.

९) संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.

१०) संचालक मंडळाने सुचविलेल्या कर्मचारी आराखड्यास् (Staffing Pattern) मंजूरी देणे.

११)मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मुदत संपत असलेने पुर्न:नियुक्ती करणे.

१२)भारतीय रिझर्व बँकेच्या सुचनेनुसार लाभांश समिकरण निधी सर्वसाधारण राखीव निधीस व नफा विभागणीतून संशयित बुडित निधीमध्ये वर्ग केलेली रक्कम संशयित बुडित निधी २०२४ या निधीत वर्ग केलेची नोंद घेणे.

१३) बँकेच्या मुख्यालय कुडित्रेच्या नुतणीकरण खर्चास मंजूरी देणे.

१४)बँकेचा सुवर्णमहोत्सव साजरा करणे व येणाऱ्या अनुशंगिक खर्चास मान्यता देणे.

१५) पुढील सालासाठी सभासद शिक्षण व प्रशिक्षण आराखडा तयार करणे.

१६)या वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर नसलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणे.

१७)मा.अध्यक्षांचे परवानगीने आयत्यावेळी आलेल्या विषयांचा विचार करणे.

मा.संचालक मंडळाचे आदेशावरून

स्थळ - कुडित्रे .

दिनांक- २७.०५.२०२५ डी.एस्.राऊत, अजित श. नरके.

मुख्य कार्यकारी अधिकारी. अध्यक्ष.

## -विशेष सूचना-

१) सभासदांनी वार्षिक साधारण सभेमध्ये नोटीसीसंबंधी सुचना करावयाची असल्यास दि. ११.०६.२०२५ पर्यंत ऑफिस वेळेत लेखी स्वरूपात द्याव्यात

२)बँकेच्या एका शेअर्सची दर्शनी किंमत रू.१००/-असून ज्या सभासदांचे भाग रू.१००/-च्या पटीत नाहीत किंवा रू.१००/-पेक्षा कमी आहेत त्यांनी कमी असणारी रक्कम सत्वर भरावी.

३) ज्या सभासदांनी वारस नोंद दिलेली नाही त्यांनी वारस नोंद द्यावी तसेच ज्या सभासद ठेवीदारांनी अद्याप के.वाय. सी. पुर्तता दिलेली नाही त्यांनी सुलभ व्यवहारासाठी सत्वर पुर्तता करणेत यावी.

४) प्रधान कार्यालय व सर्व शाखांमध्ये ताळेबंद, नफातोटा पत्रके व अंदाजपत्रक ची प्रत उपलब्ध आहे.

५)सुधारित पोटनियमानुसार ‘ क्रियाशील सभासदत्व’ पात्रतेसाठी अगोदरच्या पाच वर्षात किमान रू. १०००/- चे भाग किंवा रू.२५,०००/- चे कर्ज घेणे आवश्यक आहे.व सदर सभेस पाच वर्षातून एकदा हजर राहणे बंधनकारक आहे अन्यथा सदर सभासद संचालक मंडळाच्या निवडणूकीसाठी मतदान करणेस पात्र ठरणार नाही .

६)संचालक मंडळ सदस्यासाठीची पात्रता निकष:- किमान रू. २०००/- चे भाग व रू.५०,०००/- ची ठेव ठेवणे व क्रियाशील सदस्य असणे आवश्यक आहे.